# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ३१५ बुधवार दि.१८ जून २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







# आता दाऊद इब्राहिमही भाजपात जाणार

मुंबई : प्रतिनिधी जगातील सर्वात मोठा आणि शक्तीशाली पक्ष असल्याचा दावा करणा-या भाजपात कोणालाही पक्षात प्रवेश दिला जातो. आतापर्यंत ज्यांच्यावर भाजपनेच भ्रष्टाचाराचे आरोप केले त्यांनाच सन्मानाने पक्ष प्रवेश देऊन मंत्रीपदही दिले. आता तर ज्या व्यक्तीवर माफीया दाऊद इब्राहिमशी संबंध असल्याचे आरोप केले त्या सुधाकर बडगुजर यांना सन्मानाने पक्षप्रवेश दिला. आता भाजप दाऊदला पक्षात प्रवेश देणार का? असा उपरोधिक सवाल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज केला.

नाशिकचे माजी महापौर सुधाकर बडगुजर यांनी आज भाजप प्रवेश केला. याच बडगुजर यांच्यावर भाजपाने दाऊद इब्राहिमचा साथीदार सलीम कुत्ता सोबत संबंध असल्याचा आरोप केला होता. याबाबत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष यांनी भाजपवर तिखट टीका केली. कोणाला पक्षप्रवेश द्यावा हा त्या पक्षाचा प्रश्न आहे. परंतु हिंदुत्वाच्या गप्पा मारताना आपण काय करत आहोत, याचे भानही भाजपला राहिलेले नाही. भाजपा आमदार नितेश राणे यांनी विधिमंडळात नाशिकच्या सुधाकर बडगुजर यांनी दाऊदचा गुंड सलीम कुत्तासाठी पार्टी दिली होती असा गंभीर आरोप केला.

पार्टीत नाचतानाचे त्याचे फोटो विधानसभेत दाखवून कारवाईची मागणी केली होती आणि



आता मात्र त्यांनी हिंदुत्व मान्य केले, त्यांचे स्वागतच आहे असे म्हटले आहे. याचा अर्थ उद्या दाऊदला पक्षप्रवेश देऊन त्याने हिंदुत्व मान्य केले असेच म्हणणार का? भाजपा हा 'पार्टी वुईथ डिफरन्स' म्हणवतो. पण आज या पक्षात गुंड, मवाली, भ्रष्टाचारी यांचा भरणा झाला आहे. मुंबईतील ११९३ च्या बॉम्बस्फोटातील आरोपी व दाऊदचा साथीदार इक्बाल मिर्ची याच्याशी संपत्ती व्यवहार प्रकरणी माजी मंत्री प्रफुल्ल पटेल यांच्या राष्ट्रवादी पक्षाशी भाजपा सत्तेत भागिदारी करतो. प्रफुल्ल पटेलांना वॉशिंग मशीनमध्ये धुऊन स्वच्छ करतो. भाजपाचे हिंदुत्व बेगडी आहे, हे आम्ही सातत्याने सांगतो तेच आजही दिसले असेही सपकाळ म्हणाले.

सुधाकर बडगुजर यांचा पक्ष प्रवेश होणार आहे हे पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष व कार्याध्यक्षांनाही दुपार पर्यंत माहित नव्हते. पण पक्ष प्रवेशाला यावे लागले यावरून भाजपा पक्ष नक्की कोण चालवतो, हा खरा प्रश्न निर्माण झाला आहे असा टोलाही त्यांनी लगावला.

# मनपा आयुक्त मानसी मीना यांच्या हस्ते टीबी रुग्णांना न्यूट्रिशनल सपोर्ट किटचे वाटप

लातूर/ प्रतिनिधी :- प्रधानमंत्री टीबी मुक्त अभियान अंतर्गत सार्वजनिक आरोग्य विभाग, लातूर शहर महानगरपालिका यांच्या समन्वयाने मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांच्या प्रमुख हस्ते टीबी रुग्णांना न्यूट्रिशनल सपोर्ट किटचे वाटप करण्यात आले.





शहरातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्यातून या कीट वाटप करण्यात आल्या.विजय पस्तापुरे, प्रसाद उदगीरकर, शाम धूत,रामेश्वर सोमानी, दीपक वारद, राजू मिनियार, नरेंद्र भुतडा, संजीव भार्गव, रतन बिदादा यांच्या सहकार्यातून हे किट देण्यात आले.

यावेळी बोलताना आयुक्त श्रीमती मानसी यांनी शहरात राबविण्यात येणारा फूड बास्केट देण्याचा उपक्रम अत्यंत स्तुत्य असल्याचे सांगितले. मनपाच्या आरोग्य विभागाने या कामी राखलेल्या समन्वयाबद्दल कौतुक करतानाच टीबी रुग्णांना वर्षभरासाठीचे न्यूट्रिशनल किट पुरवठा करण्यासाठी नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

लातूर जिल्हा क्षयरोगमुक्त करण्याच्या दृष्टिकोनातून राज्य शासनाच्या वतीने औषधींचा मोफत पुरवठा करण्यात येतो.रुग्ण पूर्णपणे बरा होण्यासाठी औषधासोबतच पोषण आहार आवश्यक असतो. त्याच्या पूर्ततेसाठी लोक सहभागातून न्यूट्रिशनल सपोर्ट किट देऊन निक्षय मित्र होता येते.निक्षय मित्र होण्याची प्रेरणा घेऊन डॉ. अशोक पोद्दार यांनी आपल्या मित्रमंडळींना याकामी योगदान देण्यासाठी प्रोत्साहित केले आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती यांनी केले. डॉ. ऋषिकेश खरोळकर यांनी सूत्रसंचलन केले.

या कार्यक्रमास मनपाचे सर्व वैद्यकीय अधिकारी,आरोग्य कर्मचारी,आशा स्वयंसेविका आणि क्षयरोग विभागाच्या कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# पत्रकार संघाच्या वतीने मनपा नूतन आयुक्त मानसी मीना यांचे स्वागत



लातूर :- येथील महानगरपालिकेच्या आयुक्त म्हणून मानसी मीना यांनी नुकताच पदभार स्वीकारल्यानंतर यांचे स्वागत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई जिल्हा शाखा लातूरच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन प्रदेश उपाध्यक्ष तथा लातूर जिल्हाध्यक्ष अशोक देडे, जिल्हा सरचिटणीस अशोक हनवते व कोषाध्यक्ष अरुण कांबळे यांनी त्यांच्या कार्यालयात जाऊन स्वागत केले.

# मुळशीचे तहसीलदार रणजित भोसले निलंबित; सातबारा दुरुस्तीचं प्रकरण भोवलं.

सातबारा दुरुस्ती करताना ८५ वर्षांपेक्षा आधिकचा विलंब याबाबत विचार न करता अनियमितता केल्याने मुळशीचे (पुणे जिल्हा) तहसीलदार रणजीत भोसले यांना निलंबित करत शासनाने दणका दिला आहे. १६ जून रोजी शासनाचे अवर सचिव प्रविण पाटील यांनी त्यांच्या निलंबनाचा आदेश जारी केला आहे.

त्यामुळे महसूल विभागात खळबळ उडाली आहे.

मुळशीचे तहसीलदार यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कायदा १९६६ चे कलम १४९,१५० व १५५ चांगलेच भोवले आहे. एका सातबारावर दि टाटा पॉवर कंपनी लि. या कंपनीचे नाव कमी करुन श्री. धोंडू गोपाल ढोरे यांचे नाव दाखल करण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याविषयी तहसीलदार भोसले यांनी मालकी हक्कामध्ये नाव दाखल करण्याचा आदेश केला होता.



दरम्यान, प्रस्तुत प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयात दाखल असलेल्या रिट याचिकान्वये न्यायालयाने तहसीलदार यांनी पारित केलेला आदेश रद्द केला आहे. त्यामुळे तहसीलदार मुळशी यांनी पारित केलेल्या निर्णयाची अतिरिक्त विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचे स्तरावर चौकशी करण्यात आली. अतिरिक्त विभागीय आयुक्त यांनी मुळशीचे तहसीलदार भोसले यांचेकडून अनियमितता झाल्याचा अहवाल शासनास सादर केला होता.

अशाप्रकारे शासकीय कर्तव्य पार पाडताना गुणवत्ता व औचित्य न ठेवल्याने कर्तव्यात कसूरी करुन महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ३ चे उल्लंघन केले असल्याने तहसीलदार रणजित भोसले यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील तरतुदी अन्वये विभागीय चौकशीची कारवाई करण्याचे प्रस्तावित केले आहे.

त्यानुसार, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम ४ (१) (अ) अन्वये मुळशीचे तहसीलदार रणजित भोसले यांना शासन सेवेतून निलंबित केले आहे.

# भाजपने गुजरातला ५० वर्षे मागे ढकलले; अरविंद केजरीवाल यांची टीका



गुजरात : भाजपने ३० वर्षांच्या राजवटीत गुजरातला ५० वर्षे मागे ढकलले आहे. आज गुजरातमध्ये वीज, पाणी, रस्ते, रोजगार नाही. सर्वत्र अराजकता आहे. जगभरात उत्तम रस्ते बांधले जात आहेत, परंतु भाजप ३० वर्षांत एकही रस्ता बांधू शकला नाही. गेल्या २० वर्षांपासून विसावदरच्या लोकांनी भाजपाला जिंकू दिले नाही. विसावदरची निवडणूक महाभारतापेक्षा कमी नाही. भाजपकडे पैसा आणि शक्ती आहे, तर आपकडे जनतेचे प्रेम आहे. जनता आपला निवडून देईल, असे प्रतिपादन आम आदमी पक्षाचे संयोजक आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी केले आहे. गुजरातमधील विसावदर जागेसाठी होणाऱ्या पोटनिवडणुकीच्या प्रचारासाठी खारिया गावात झालेल्या जाहीर सभेत केजरीवाल यांनी भाजपवर तीव्र हल्लाबोल केला. केजरीवाल म्हणाले की, राजकोट ते जुनागढ हे रस्त्याचे अंतर १२५ किलोमीटर आहे. राजकोट ते जुनागढ हा रस्ता इतका वाईट स्थितीत आहे की, मला तिथे पोहोचण्यासाठी साडेतीन तास लागले. आज संपूर्ण जग आधुनिक होत आहे, जगभरात उत्कृष्ट रस्ते बांधले जात आहेत, परंतु ३० वर्षे गुजरातवर राज्य करूनही भाजप रस्ते बांधू शकले नाही. गुजरातमधील रस्त्यांची अवस्था अशी आहे की, लोकांना ४० किलोमीटर वेगाने गाडी चालवावी लागते. तर इतर राज्यांमध्ये वाहने १००-१५० किलोमीटर वेगाने धावतात. रविवारी मी जुनागडहून कालसारीला एका जाहीर सभेला संबोधित करण्यासाठी गेलो होतो. तिथेही सर्व रस्ते खड्डे पडलेले होते. भाजपने ३० वर्षांत काय काम केले? केजरीवाल म्हणाले की, गुजरातमध्ये दर तासाला वीज खंडित होते. रविवारी आम्ही कालसारीला गेलो तेव्हा तिथे वीज नव्हती. वीज नाही आणि गावांपासून शहरांपर्यंत रस्ते नाहीत. सर्व सरकारी नोकऱ्यांचे पेपर्स फुटत आहेत.

तरुणांना रोजगार मिळत नाही. शेतकऱ्यांना वीज, पाणी, खते आणि पिकांचा भाव मिळत नाही. ३० वर्षे राज्य करूनही भाजपने गुजरातच्या लोकांना काहीही दिले नाही.




# संपादकीय

## मरणाचा पूल !

देशात सार्वत्रिक बेपर्वाई सर्वत्र दिसते. सार्वजनिक आणि व्यक्तिगत अशा दोन्ही ठिकाणी त्याचे प्रत्यंतर येते. प्रकल्प पूर्ण केले जातात, अनेकदा त्यात दिरंगाई होते, पूर्ण झाले तरी त्यांची देखभाल नीट होत नाही. सार्वजनिक मालमत्तेचा वापर करताना अनेकदा लोकांचेही भान सुटते. रविवारी मावळ तालुक्यातील इंदोरी येथील कुंडमळा येथे इंद्रायणी नदीवरील लोखंडी पादचारी पूल कोसळून झालेली दुर्घटना हे त्याचेच एक ठळक उदाहरण. यात चार पर्यटकांचा मृत्यू झाला आणि १८ जण जखमी झाले. ३८ पर्यटकांना सुखरूप बाहेर काढण्यात आल्याने त्यांचा जीव वाचू शकला. १९९३ मध्ये हा लोखंडी पूल बांधण्यात आला होता.

नदी ओलांडण्यासाठी पुलाचा वापर केला जात होता. त्यावरून स्कूटर, मोटारसायकलही जात होत्या. अलीकडेच हा पूल जीर्ण झाला आणि कोसळला. खरे तर ३०-३२ वर्षांतच हा पूल इतका जीर्ण झाला कसा, हा प्रश्नच आहे. पुलाची अशी 'अवस्था' असल्यामुळे एकच दुचाकी येऊ शकेल, एवढीच त्याची क्षमता. पावसाळी पर्यटनासाठी पूलावर मोठ्या संख्येने पर्यटक आले, पाणी आणि निसर्गाचा आनंद लुटत असताना पूल चाळीसहून अधिक पर्यटक, त्यांची वाहने यांना घेवून क्षणार्धात वाहत्या नदीत कोसळला! अचानक झालेल्या या घटनेने गोंधळ उडाला. अनेकांनी प्रयत्न करून काहीजणांना वाचवण्यात यश आले. वास्तविक पूल जुना झाल्याचे राज्य सरकारला ठाऊक होते. पुलाची अवस्था वाईट ली असून त्याच्या दुरुस्तीसाठी नागरिकांनी सरकारकडे वारंवार विनंती केली होती. गेली आठ वर्षे कित्येकदा तक्रारी करूनही पुलाची पुनर्बांधणी करण्यात आली नाही. साधी डागडुजीही झाली नाही.

मागणीकडे डोळेझाक केली गेली. शेवटी त्याचे पर्यवसान या अपघातात झाले. त्यासाठी आता कोणाला जबाबदार धरणार? संबंधित खात्याला, खात्याच्या अधिकार्यांना की स्थानिक लोकप्रतिनिधींना? हा पूल धोकादायक असल्याचा सूचना फलक पुलाच्या बाजूला लावण्यात आला असला, तरीही तेथे पोलीस का नव्हते, हा प्रश्नच आहे. हा पूल जर धोकादायक होता, तर तेथे अडसर लावून संपूर्ण प्रवेशबंदी का करण्यात आली नाही? मरणाच्या दारात पर्यटकांना का ढकलले गेले? आता या दुर्घटनेची सखोल चौकशी करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले असून, देखभालीबाबत कोणतेही दुर्लक्ष झाल्याचे आढळल्यास, संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले आहे; मात्र काही दिवासंपूर्वी बारामतीत पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली असताना, अजित पवार तेथे तातडीने गेले होते; पण इंद्रायणी दुर्घटनेनंतर मात्र ते त्याच दिवशी घटनास्थळी आले नाहीत, असा आरोप करण्यात येत आहे. त्याचे काय ते उत्तर अजित पवार देतीलच. ते येण्या न येण्याने प्रश्न सुटणार नसला तरी राजकीय संवेदनशीलतेचा प्रश्चन उरतोच. त्या जागेवर नवा पूल उभारून आणि राज्यातील अशा मोडक्या पुलांवरील संभाव्य दुर्घटना टाळून ते दाखवतील, अशी आशा आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी राज्यातील जुन्या पुलांचे संरचनात्मक परीक्षण करण्याचे निर्देश दिले आहेत. याआधीही अशा तसेच शंभर वर्षे पूर्ण झालेल्या पुलांचे परीक्षण झाले आहे. त्यावर उपाययोजना त्याही वेळेवर झाल्या तरी अनेकांचे जीव वाचवता येऊ शकतील. इंद्रायणी नदीवरी या पुलाच्या नवीन बांधकामासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आल्याचे सांगण्यात येते; पण राज्य अर्थसंकल्प मांडण्यात येऊन बरेच दिवस उलटून गेले. तरीही याबाबतची वर्क ऑर्डर निघण्यास विलंब लागावा, हे गंभीर आहे. राज्यातील शेकडो पुलांची दुरवस्था असून, त्यांची यापूर्वीच दुरुस्ती करण्याची गरज होती. दर पावसाळ्याच्या आधी अशाप्रकारचे जोखमीचे पूल कोणते, त्यांची तपासणी होऊन ते दुरुस्त झाले पाहिजेत अथवा तेथे ये-जा करण्यास बंदी तरी करण्यात आली पाहिजे. शिवाय अशा जुन्या पूल, साकवांची जबाबदारी निश्चित केली पाहिजे. संबंधित बांधकाम खाते, पोलिस यांच्यावर वाहतूक सुरक्षेचे काम सोपवले पाहिजे. एवढ्या साध्या साध्या गोष्टी सरकारला का जमत नाहीत? या प्रश्नाला दुसरीही एक बाजू आहे. कुंडमळा येथील इंद्रायणी नदीच्या दुसर्या बाजूला असलेल्या लोकवस्तीतील नागरिकांसाठी रहदारीसाठी हा एकच पूल आहे. याचा अर्थ, त्याची दुरुस्ती तातडीने करण्याची गरज होती. स्वतःच्या सुरक्षेची कोणतीच पर्वा न बाळगता दिसत असूनही या धोक्याच्या दिशेने धाव घेणार्या पर्यटकांचीही चूकही मोठी आहे, असे म्हणावे लागेल. पूल कमजोर आहे, हे माहीत असतानाही पर्यटक पुलावर छायाचित्रे काढण्यासाठी जात आणि थांबत, तेथे रील्स करत बसत. केवळ एक दुचाकी जाईल, एवढीच जागा असताना, दोन्ही बाजूंनी वाहने घेऊन जाणे, रेटारेटी करणे, हेही चुकीचेच आहे.

पावसाळ्यात माळशेज, ताम्हीनी, लोणावळा, आंबोली, महाबळेश्वर आदी पर्यटनस्थळी पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी लोक जातात; पण ज्यावेळी मुसळधार पाऊस असतो, अथवा पूरसदृश स्थिती असते, तेव्हा जाऊ नका, असे सांगूनही लोक तिथे जातात. लोणावळ्याजवळ भुशी डॅमसारख्या ठिकाणी लोक दारू पिऊन धिंगाणा घालतात. समुद्रात वा नदीच्या पाण्यात खोलवर जाऊ नका, असे सांगूनही ते ऐकत नाहीत. डोंगरकड्याच्या टोकावर सेल्फी काढताना पाय घसरून दरीत कोसळतात. माथेरानला धबधब्यात अशाच घटनेत तिघांचा बळी गेला. अशा अनेक घटना गेल्या दोन-तीन वर्षांत घडल्या. तरीही लोकांना अती उत्साहास आवर घालता येत नसेल, तर अशी नवनवी संकटे उद्भवणारच. ती टाळणे इतकेच हाती असते. त्यासाठी शासकीय बेफिकिरी थांबली पाहिजे आणि सर्वसामान्यांनीही, खास करून, तरुणाईने संयमाने वागले पाहिजे. एक माणूस जेव्हा नाहक जीवानिशी जातो, तेव्हा त्याचे अख्खे कुटुंबच संकटात सापडते. म्हणूनच प्रत्येकाने स्वातंत्र्याचा अनुभव घेताना जबाबदारीची जाणीवही ठेवली पाहिजे.

# जल,स्थल,वायू यावर मानवी अतिरेक वाढल्याने अनेक धोके निर्माण होऊन दुर्घटना होत आहे.

दिवसेंदिवस ज्याप्रमा णे अत्याधुनिक सुविधा निर्माण होत आहे त्याच्या दुप्पट विणाशाचे दरवाजे उघडल्याने दुर्घटनांचे प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते.ही स्थिती फक्त भारतातच नसुन संपूर्ण जगभर दिसुन येते.महत्वाचे म्हणजे जगभरातील अनेक देशात २०२५ मध्ये भयावह युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसून येते व अनेक भयावह दुर्घटना पहायला मिळत आहे आणि दुर्घटनांची साखळी सुरूच आहे.म्हणजे आजच्या परिस्थितीत पृथ्वीवरील मानव, पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतू अत्यंत कठीण परिस्थितीत जगत असल्याचे दिसून येते. आपण म्हणतो की आकाशातील प्रवास (विमानप्रवास) सर्वात सुरक्षित असल्याचे जगजाहीर आहे.परंतु आज विमानतळ दुर्घटनांचे प्रमाणात सुध्दा मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते. दिनांक १२ जूनला गुजरात मधील अहमदाबाद विमान दुर्घटना अंत्यंत भयावह होती. विमानाने उडान घेताच ३० सेकंदात एका मेडिकल होस्टेलवर कोसळले यात विमानातील २४१ प्रवाशांचा मृत्यू झाला व होस्टेलमधील अनेक विद्यार्थींचा मृत्यू झाला व अनेक गंभीररीत्या जखमी झाले.त्यामुळे आता प्रश्न निर्माण होतो की विमानाने प्रवास चांगला की वाईट. आपण हेलिकॉप्टर सुरक्षित समजतो परंतु हेलिकॉप्टरच्या दुर्घटनांचे प्रमाणात सुध्दा वाढले आहे याचे जिवंत उदाहरण म्हणजे दिनांक १२ तारखेला केदारनाथ दर्शनासाठी गेले असता दर्शनानंतर ते आर्यन एव्हिएशनच्या हेलिकॉप्टरने गुप्तकाशीकडे निघाले असताना अचानक हवामान बदलले दाट धुके व अवकाळी पावसामुळे दृश्यमानता कमी झाल्याने हेलिकॉप्टर जंगलात कोसळले यात एकूण ७ प्रवास्यांचा मृत्यू झाला.म्हणजे सध्याच्या परिस्थितीत निसर्ग सुध्दा मानवाच्या अतीरेकाला त्रासल्याचे दिसून येते व त्यामुळे दु:खद घटना घडतांना दिसतात.अशा परिस्थितीत प्रश्न उपस्थित होतो की आपल्यासाठी काय सुरक्षित आणि काय सुरक्षित नाही?मावळ तालुक्यातील प्रसिद्ध कुंडमळा येथे १५ जून रोजी पर्यटकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.येथील इंद्रायणी नदीवरील असलेल्या ३२ वर्षे जुन्या पुलावर क्षमतेपेक्षा जास्त नागरिकांच्या गर्दीमुळे पुलाचा मधला भाग अचानक कोसळला. सुमारे ३५-४० जण पुलावरून कोसळल्याने जखमी झाले असून चौघांचा मृत्यू झाला ६ जणांची प्रकृती अत्यंत गंभीर आहे आणि नदीचा प्रवाह जास्त असल्याने अनेक जण वाहून सुध्दा गेल्याचे सांगितले जाते.अशाप्रकारे निसर्ग सर्वांचीच गोची करतांना दिसते. २२ एप्रिल २०२५ ला पहलगाम येथील शांतमय ठिकाणी पर्यटक आनंद लुटण्यासाठी गेले असता अचानक आतंकवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केला यात २८ जणांचा निर्घृणपणे हत्या करण्यात आली.म्हणजे आजच्या परिस्थितीत एकांतवास सुध्दा कठीण झाला आहे.याचप्रमाणे दिवसेंदिवस रेल्वेचे सुध्दा अपघात वाढल्याचे दिसून येते.नुकताच मुंबई येथे लोकल ट्रेनचा अपघात झाला यात अनेकांचा बळी गेला.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत मानवजातीसाठी कोणतेही ठीकाण सुरक्षित नसल्याचे दिसून येते.आतातर नौकरीवर जातांना,बाहेर जातांना, पायदळ फिरतांना सुध्दा आपण सुरक्षित आहोत की नाही याचीही शंका निर्माण झाली असून चिंता वाटायला लागली आहे.याहीपलीकडे आपण विचार केला तर देवदर्शन किंवा फिरणेही महागात पडतांना दिसत आहे.त्यामुळे प्रश्न निर्माण होतो की जाये तो जाये कहा!आतातर इजरायल -इरान युद्ध आरपारचे समजल्या जात आहे यामुळे तिसऱ्या महायुद्धाचे सावट निर्माण झाले आहे.कारण युक्रेन-रशिया संघर्ष सुरूच आहे सोबतच अनेक देशात गृहयुद्ध भडकल्याचे दिसून येते.सध्याचे युध्द साधे रहाले नसुन बॉम्ब वर्षाव, ड्रोन हल्ला, मिसाईल अशाप्रकारे अत्याधुनिक शस्त्रास्त्रे वापरल्या जात आहे.सध्याच्या परिस्थिती युक्रेन, रशिया, ईरान,इजरायल यांच्या युध्दामुळे सर्वत्र आगीचे सावट दिसून येते.यामुळे लाखोंच्या संख्येने जिवित हाणी होत आहेच सोबतच वित्तीय हानी सुध्दा मोठ्या प्रमाणात होत आहे.म्हणजेच मानवजातीसाठी सध्याचा काळ अत्यंत बिकट,गंभीर व धोकादायक स्थितीत येवून ठेपला आहे. आज पृथ्वीवर होत असलेल्या मानवी अतिक्रमणामुळे हिमकडा कोसळने,ज्वालामुखीचा उद्रेक, सुनामी, भूकंप ढगफुटी,अती पाऊस,अती उष्णता,अती थंडी आणि आता युध्दजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेला आगडोंब यामुळे सर्वत्र विणाशलिला दिसून येत आहे.मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी जितक्या सुखसुविधा निर्माण केल्या आहेत त्याचे दुष्परिणाम हळूहळू वाढत असून विनाशाकडे वाटचाल करीत आहे ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.या संपूर्ण घटनाक्रमावरून लक्षात येईल की स्थल, वायू,जल, आकाश-पाताळ हे संपूर्ण ठिकाण आज मानवामुळे विणाशाचे कारण बनत आहे व यांमुळेच भयावह दुर्घटना होतांना दिसतात.

*******

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# यूनोचे काम काय?

जगात विविध देशांमध्ये सध्या लष्करी संघर्ष तीव्रपणे सुरू असताना युनायटेड नेशन्स ऑर्गनायझेशन म्हणजे संयुक्त राष्ट्रसंघ या नावाने ओळखली जाणारी जागतिक संघटना नक्की काय करत आहे याबाबत शंका घेण्यास वाव आहे. जागतिक पातळीवर शांतता राहावी म्हणून स्थापन करण्यात आलेल्या यूनोला जागतिक संघर्षामध्ये कोणतीच भूमिका घेता येत नाही हे पुन्हा एकदा सिद्ध होत आहे. दुसर्या महायुद्धामध्ये आण्विक युद्धामुळे जी प्रचंड प्राणहानी झाली, त्यामुळे यूनो सक्रिय झाली होती आणि जगात दीर्घकाळ शांतता राहावी यासाठी प्रयत्नही करण्यात येत होते.

या कालावधीमध्ये अमेरिका आणि रशिया सारख्या महासत्तांमध्ये जरी शीतयुद्ध सुरू असले तरी कोणतेही मोठे लष्करी संघर्ष झाले नव्हते. दोन्ही कोरियन देशांमध्ये झालेली युद्ध असोत किंवा भारत-पाकिस्तान, भारत-चीन यासारखे युद्ध असो किंवा व्हिएतनामसारखे युद्ध असो, या लष्करी संघर्षाने संपूर्ण जगावर फारसा फरक पडला नव्हता. पण सध्या २०२५ मध्ये ज्या प्रकारच्या घडामोडी घडत आहेत त्या पाहता सध्याचे लष्करी संघर्ष जगाला पुन्हा एकदा एखाद्या महायुद्धाकडे नेऊ शकतात असे संकेत मिळत आहेत.

या पार्श्वभूमीवर देशांची शिखर संघटना असलेल्या यूनोकडून कोणतातरी ठोस पुढाकार अपेक्षित आहे.आज अमेरिकेसारखा बलाढ्य देशच यूनोचे अस्तित्व मान्य करत नसल्याने आणि अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनाच जगाचा सर्वेसर्वा व्हायची इच्छा असल्याने ते त्यांच्या सोयीने या लष्करी संघर्षामध्ये भूमिका घेत आहेत. सध्या इराण आणि इस्रायल यांच्यात सुरू असलेल्या लष्करी संघर्षाची तीव्रता पाहिली तर हा संघर्ष कोणत्याही टोकाला जाऊ शकतो.

रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध गेले तीन वर्षे सुरू असले तरी तो त्यांच्यापुरता मर्यादित विषय राहिला आहे. जरी या संघर्षामध्येही जग 'नाटो'मुळे विभागले गेले असले तरी त्याला धार्मिक पाया नव्हता. पण इस्रायल आणि इराण यांच्यातील या लष्करी संघर्षामुळे जगाची जी विभागणी होऊ पाहत आहे त्याला धार्मिक वास येत असल्याने ते अधिक धोकादायक आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये गेल्या महिन्यात जो लष्करी संघर्ष झाला तेव्हासुद्धा भारत आणि पाकिस्तान यांच्या बाजूने जे देश उभे राहिले त्यांच्यामध्येही असा धार्मिक पाया दिसून आला होता. गेल्या आठवड्यात इस्रायलने इराणची खोडी काढल्यावर इराणनेसुद्धा त्याला प्रत्युत्तर दिले आणि इस्रायलमधील प्रमुख शहरांवर जोरदार मारा केला. इराणच्या नेत्यांनी इस्रायलची बाजू घेणार्या अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स या देशांनासुद्धा हल्ला करण्याचा इशारा दिला आहे. जेव्हा अशा प्रकारे दोन देशांमध्ये लष्करी संघर्ष सुरू असतो तेव्हा त्या देशांचे नेते अस्मितेच्या युद्धामध्ये गुंतले असल्याने कोणालाच माघार घ्यायची नसते. अशा वेळीच यूनोसारख्या संघटनांनी पुढाकार घेऊन असा लष्करी संघर्ष थांबवण्याचे प्रयत्न करणे अपेक्षित असते. पण गेल्या काही वर्षांमध्ये यूनोकडून असे कोणतेही प्रयत्न होताना दिसत नाहीत. फक्त एखादे परिपत्रक काढून अशा लष्करी संघर्षाचा निषेध करणे इतकेच काम यूनोकडून केले जाते. अमेरिका किंवा रशिया यासारख्या मोठ्या देशांवर नियंत्रण ठेवणेसुद्धा यूनोला शक्य राहिलेले नाही. साहजिकच अमेरिका जी भूमिका घेते त्याभोवती संपूर्ण जग फिरत असते हेच गेल्या काही वर्षांमध्ये लक्षात आले आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील लष्करी संघर्ष माझ्यामुळेच सुटला असे डोनाल्ड ट्रम्प सतत म्हणत आहेत. त्याचा संदर्भसुद्धा या ठिकाणी महत्त्वाचा मानावा लागेल. यूनोचे काम संपूर्णपणे निष्क्रिय झाल्यानेच अमेरिकेसारखे देश आणि त्यांचे नेते जगावर नियंत्रण मिळवण्याच्या दृष्टिकोनातून असे काही निर्णय घेत राहतात. अर्थात जगातील जे लष्करी संघर्ष आहेत त्यापैकी कोणते थांबवायचे आणि कोणते जास्त पेटवायचे हे त्यांच्या सोयीप्रमाणेच ठरत असते हेसुद्धा लक्षात घ्यावे लागते.




तीन वर्षांपासून सुरू असलेला रशिया-युक्रेन संघर्षापेक्षाही सध्या इराण आणि इस्रायलमध्ये सुरू असलेला लष्करी संघर्ष गंभीर आहे. इस्रायलला पाठिंबा देणार्या ब्रिटन, अमेरिका आणि इतर देशांची लष्करी तळे आणि व्यापारी जहाजे यांना लक्ष्य करण्याचा इशारा इराणने दिला असल्याने हा संघर्ष कोणत्या दिशेने जात आहे हे जागतिक नेत्यांनी लक्षात घ्यायला हवे. जगातील बहुतेक देश सध्या अण्वस्त्रधारी आहेत आणि जर धार्मिक अस्मितेचा विषय जास्त ताणला गेला तर इराणसारखे देश अण्वस्त्रांचा वापर करण्यास मागे पुढे पाहणार नाहीत. पाकिस्ताननेसुद्धा भारतासोबतच्या लष्करी संघर्षामध्ये अप्रत्यक्षपणे आम्ही अण्वस्त्रधारी आहोत असा इशारा दिला होता.

दुसर्या महायुद्धामध्ये अण्वस्त्रांचा वापर झाल्यामुळे जी प्रचंड हानी झाली त्यामुळेच यूनोला पुढाकार घेऊन जागतिक शांतता प्रस्थापित करावी लागली होती आणि आता पुन्हा एकदा जग आण्विक युद्धाकडे वळू पहात असेल तर यूनोला पुन्हा एकदा सक्रिय व्हावे लागेल. अर्थात विविध प्रमुख देशांच्या नेत्यांच्या माध्यमातूनच यूनोची संघटना तयार झाली असल्याने जगातील प्रमुख नेत्यांनाच यूनोच्या माध्यमातून जागतिक पातळीवर शांतता नांदावी यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत.

एकेकाळी जी युद्धे वसाहतवादाच्या निमित्ताने लढली जात असत ती आता धार्मिक पातळीवर लढली जाऊ लागल्याने जगाशी अशा प्रकारची विभागणी होणे अत्यंत धोकादायक ठरणार आहे. अशा प्रकारची विभागणी टाळण्यासाठी यूनोने आता जाणीवपूर्वक पुढाकार घेण्याची गरज आहे. जागतिक शांतता निर्माण होण्यासाठी काम करणारी ही संस्था आहे हे दाखवून देण्याची हीच वेळ आहे.

# तेलाचे भाव आणि महागाई

कच्च्या तेलाच्या किमती वाढत गेल्या, तर तेलविक्री कंपन्यांना पेट्रोल आणि डीझेलच्या किमती वाढवाव्या लागतील. यामुळे वाहतूक, अन्नपदार्थ तसेच इतर वस्तू महाग होऊ शकतात.

मध्यपूर्वेत पुन्हा एकदा भडका निर्माण झाल्यामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत ताबडतोब दहा टक्क्यांनी वाढ झाली आहे. ३० मे २०२५ रोजी कच्च्या तेलाचे दर ६२ डॉलर प्रति बॅरल इतक्या खाली घसरले होते; परंतु यात वाढ होत, भाव ७८ डॉलर प्रति बॅरलवर पोहोचले. त्याचप्रमाणे लगेच शेअर बाजारातही घसरण झाली. अर्थात, जागतिक अस्थिरता निर्माण झाल्यामुळे सोने मात्र दहा ग्रॅमला एक लाख रुपयांवर गेले. बर्याचदा ज्यावेळी आंतरराष्ट्रीय व्यापारात अडथळे येतात आणि शेअर बाजार कोसळतो, तेव्हा गुंतवणूकदार सोन्याकडे वळतात. यावेळी असेच घडले. इस्रायलने १३ जून रोजी इराणवर हल्ला केला.

प्रत्युत्तरादाखल इराणने बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि ड्रोनसह हल्ले केले. त्यामध्ये तेलअविवच्या किरया भागातील इस्रायलच्या लष्करी आणि संरक्षण मंत्रालयाला लक्ष्य करण्यात आले होते. इराणचे हे हल्ले सुरूच राहिले, तर त्यांच्यावरील हल्ले अधिक तीव्र केले जातील, असे इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी म्हटले आहे. तर तेहरान बेचिराख करून टाकू, असा इशारा इस्रायलच्या संरक्षणमंत्र्यांनी दिला आहे. इराण आणि अमेरिकेच्या दरम्यान अणुकरारावर वाटाघाटी सुरू आहेत. इराणला अणुकरार करण्यासाठी आणखी एक संधी असल्याचे मत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्यक्त केले आहे. तर इस्रायलच्या हल्ल्यानंतर अमेरिकेबरोबर करारावर पुढे चर्चा करणे निरर्थक असल्याचे इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्यांनी म्हटले आहे.

इस्रायलने इराणच्या दोन तेल आणि नैसर्गिक वायू शुद्धीकरण प्रकल्पांवर हल्ले केले आहेत. इराण हा जगातील तिसर्या क्रमांकाचा तेल उत्पादक देश आहे. शिवाय इराणचे भौगोलिक स्थान हे अत्यंत महत्त्वाचे आहे. तेथे होरमुझची सामुद्रधुनी ही एक जलवाहतूक मार्गिका आहे. तेथून सौदी अरेबिया, कुवेत, इराक यासारख्या देशांचा तेलपुरवठा होतो. जर इराणने हा मार्ग बंद केला, तर जगातील सुमारे २० टक्के तेलपुरवठा थांबू शकतो. त्यामुळेच तेलाच्या किमती भडकल्या आहेत. कच्च्या तेलाच्या किमती अशाच वाढत गेल्या, तर तेलविक्री कंपन्यांना पेट्रोल आणि डीझेलच्या किमती वाढवाव्या लागतील. यामुळे वाहतूक, अन्नपदार्थ तसेच इतर वस्तू महाग होऊ शकतात.

इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धामुळे सर्वाधिक फटका आधीच कर्जबाजारी असलेल्या पाकिस्तानला बसला आहे. तिथे पेट्रोल आणि डीझेलचे भाव भारताच्या तुलनेत दुपटीने वाढले आहेत. पाकिस्तानच्या हाय स्पीड डीझेलच्या किमतीत प्रति लिटर सुमारे आठ आणि पेट्रोलच्या किमतीत प्रति लिटर चार रुपये ८० पैसे पाकिस्तानी रुपयांची वाढ करण्यात आली आहे. आता तिथे हाय स्पीड डीझेल २६२ रुपये प्रति लिटर तर पेट्रोल २५८ रुपये प्रति लिटर असे भाव झाले आहेत. अगोदरच युक्रेन-रशिया आणि इस्रायल-हमास संघर्षाचे जगातील वस्तू बाजार किंवा कमोडिटी मार्केटवर विपरीत परिणाम झाले आहेत. इस्रायल-इराण तणावामुळे एका आठवड्यात कच्च्या तेलाचे भाव सोळा टक्क्यांनी वधारले आहेत. इराणने होरमुझ सामुद्रधुनी व्यापारासाठी बंद करण्याचे अतिरेकी पाऊल उचलू नये, यासाठी बरेच देश प्रयत्नशील आहेत. भारतात ८७ टक्के खनिज तेल आयात केले जाते आणि ते मोठ्या प्रमाणात होरमुझच्या मार्गाने आणले जाते. तेलाचे दर वाढले, की आयातखर्च वाढून वित्तीय तूट मर्यादेबाहेर जाते. अशावेळी रिझर्व्ह बँकेला व्याजदरवाढीचा पर्याय स्वीकारावा लागेल आणि तसे झाल्यास, त्याचा उत्पादनवृद्धीवर प्रतिकूल परिणाम होईल.

२०२१च्या दिवाळीनंतर कच्च्या तेलाचे भाव बॅरलला ८५ डॉलरपर्यंत पोहोचले होते.त्यामुळे देशातील पेट्रोल आणि डीझेलचे भावही विक्रमी पातळीवर पोहोचले होते. पेट्रोल व डीझेलचा अर्थव्यवस्थेवर व्यापक परिणाम होत असतो. त्यामुळे अन्नधान्यांपासून ते खतांपर्यंत आणि दूध-अंड्यापासून ते फळे-भाजीपाल्यापर्यंत सर्व वस्तू प्रचंड महाग झाल्या होत्या. टोमॅटो ८० रुपये किलो आणि कोथिंबिरीची एक जुडी तेव्हा सव्वाशे रुपयाला गेली होती. इतकी महागाई कधी कुणी पाहिली आहे का? २०१८ सालानंतर आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे भाव इतके कधीही वाढलेले नव्हते. २०२१ अखेर जगभर कोविड संकट निवळत चालले होते. त्यामुळे अर्थव्यवस्थांना उभारी मिळू लागली.

परिणामी सर्वच वस्तूंची मागणी वाढत चालली आणि त्याचे पर्यवसान इंधनांच्या किमती वाढण्यात झाले होते. त्यावेळी जगातील प्रमुख तेल उत्पादक देशांनी तेलाचे भाव वधारले असतानाही, उत्पादनात टप्प्याटप्प्यानेच वाढ करण्याचे ठरवले होते. २०२० मध्ये ब्रेंट क्रुडची किंमत बॅरलला ४२ डॉलर होती, ती २०२१ अखेर दुपटीवर गेली. अशावेळी मागणीच्या तुलनेत उत्पादन व पुरवठा मोठ्या प्रमाणात वाढला असता, तर भाव खाली आले असते;

परंतु तेलनिर्यातदारांची 'ओपेक' ही संघटना तसेच तेल उत्पादकांचा दुसरा एक समूह यांच्या बैठकीत केवळ प्रतिदिन चार लाख बॅरल्सनेच उत्पादन वाढवण्याचा निर्णय झाला. कोविडच्या काळात अनेक देशांनी प्रवासबंदी घातली होती. त्यामुळे कच्च्या तेलाच्या उत्पादनकपातीचा निर्णय राबवण्यात आला; परंतु कोविड महामारी संपल्यानंतर मागणीत लक्षणीय वाढ होत असूनही, तेलसंपन्न देशांनी त्यानुसार उत्पादन वाढवले नाही. २०२५ मध्ये आज उत्पादनापेक्षा तेलवाहतुकीचा प्रश्न निर्माण होणार आहे. सध्याच्या या वातावरणात इराणमधून भारतीयांना जमीनमार्गे भारतात आणण्यास सुरुवातही झाली आहे.

सध्या चलनफुगवट्याचा दर २.५ टक्क्यांवर आला असून, तो आणखी पाव टक्क्याने घसरेल, असा अंदाज केंद्र सरकारच्या ग्राहक कामकाज विभागाने व्यक्त केला आहे; परंतु तेलाचे दर चढेच राहिल्यास आणि अतिवर्षामुळे पिकांचे नुकसान झाल्यास, भाववाढीचे संकट पुन्हा उद्भवू शकते, हे लक्षात घेतले पाहिजे.

# क्रंची कधी खाल्ला आहे का? नाही तर लगेच नोट करा रेसिपी; लहान मुलं होतील खुश

बर्गर ही मुलांची आवडती फास्ट फूड डिश आहे, पण जर त्यात थोडासा क्रंच आणि हटके ट्विस्ट दिला तर ती अधिक चविष्ट आणि मजेदार होते. आज आपण बनवणार आहोत कुरकुरे बर्गर, जो कुरकुरीत कुर्कुरे चिप्स, व्हेज टिक्की आणि चविष्ट सॉससह तयार होतो. हा बर्गर खास पार्टीसाठी, टिफिनसाठी किंवा कधीही खाण्यासाठी एकदम परफेक्ट आहे. घरच्या घरी कमी वेळात आणि निवडक साहित्यापासून तुम्ही ही डिश घरीच तयार करू शकता.

सध्या पावसाचे दिवस सुरु आहेत अशात बाहेरचे अन्न खाणे आपल्या आरोग्यासाठी घातक ठरू शकते. सध्या फूड पॉइजनिंगचे प्रमाण फार वाढत आहे अशात चविष्ट आणि रुचकर पदार्थ घरीच बनवा आणि कुटुंबालाही खुश करा. आजची ही कुरकुरीत रेसिपी तुमच्या संध्याकाळच्या नाश्त्यासाठी एक उत्तम पर्याय आहे. चला नोट करूयात याचे साहित्य आणि कृती.

साहित्य

टिक्कीसाठी:

बटाटे – २ मध्यम (उकडून मॅश केलेले)
गाजर – १ (किसलेले)
कांदा – १ (चिरलेला)
हिरव्या मिरच्या – १ (चिरलेली)
धणे–जिरे पूड – १/२ चमचा
गरम मसाला – १/४ चमचा
मीठ – चवीनुसार
ब्रेडक्रंब्स – १/२ कप
तेल – तळण्यासाठी

बर्गरसाठी:




बर्गर बन – २
मेयोनीज – २ चमचे
टोमॅटो केचप – १ चमचा
कोथिंबीर – थोडी (चिरलेली)
कांदा – १ (गोल चकत्या)
टोमॅटो – १ (गोल चकत्या)
चीज स्लाइस – १ (प्रत्येक बर्गरसाठी)
मक्याचे चिप्स – चुरा करून
मैदा – १ चमचा
कोर्नफ्लोर – १ चमचा

कृती यासाठी सर्वप्रथम एका बाउलमध्ये मॅश केलेले बटाटे, किसलेले गाजर, कांदा, मिरची, धणे–जिरे पूड, गरम मसाला,

मीठ आणि ब्रेडक्रंब्स घालून सगळं नीट मिक्स करा.

टिक्कीच्या आकारात गोळे करून थोडं तेल लावलेल्या तव्यावर दोन्ही बाजूंनी खरपूस शॅलो फ्राय करा.

एका प्लेटमध्ये मक्याचे चिप्स घ्या आणि त्याचा चुरा करा

आता एका वाडग्यात कोर्नफ्लोर , मैदा, मीठ आणि हलका मसाला घालून एक स्लरी तयार करा

बर्गर बनवण्यासाठी बर्गर बन मधून अर्धा चिरून घ्या. त्याच्या दोन्ही भागांवर मेयोनीज व केचप लावा.

एकाच भागावर टिक्की, त्यावर कांदा व टोमॅटोच्या चकत्या, वर चीज स्लाइस आणि थोडी कोथिंबीर ठेवा. मग दुसरा बन ठेवून दाबा.

तयार बर्गर स्लरीमध्ये बुडवून मग मक्याचे चुऱ्यात छान घोळवून घ्या

आता कढईत तेल गरम करून हा बर्गर त्यात छान डीप फ्राय करा, मंद आचेवरच याला तळा

गरमागरम कुरकुरीत बर्गर सॉस किंवा केचपसह खाण्यासाठी सर्व्ह करा.

हवे असल्यास मेयोनीजमध्ये थोडासा चिली फ्लेक्स किंवा थाय सॉस घालून स्पायसी सॉस बनवू शकता.

## पराठा किंवा चपातीसोबत खाण्यासाठी झटपट बनवा खोबर काकडीची चवदार चटणी, नोट करून घ्या रेसिपी

सकाळच्या नाश्त्यात बऱ्याचदा सर्वच घरांमध्ये चपाती, पराठा, थालीपीठ किंवा इतर अनेक पदार्थ बनवले जातात. डोसा किंवा इडली बनवल्यानंतर त्यासोबत खाण्यासाठी चटणी बनवली जाते. मात्र नेहमीच खोबऱ्याची चटणी खाऊन कंटाळा आल्यानंतर तुम्ही सोप्या पद्धतीमध्ये झटपट काकडी खोबऱ्याची चटणी बनवू शकता. काकडीमध्ये असलेले पाणी शरीर हायड्रेट ठेवते. याशिवाय यामध्ये असलेले घटक शरीराला पोषण देतात. आहारात काकडीचे सेवन केल्यास शरीर कायम निरोगी आणि हायड्रेट राहील. यामध्ये ९० टक्के पाणी असते. त्यामुळे शरीरात निर्माण झालेली पाण्याची कमतरता भरून निघते. भारतामध्ये वेगवेगळ्या पदार्थांचा आणि भाज्यांचा वापर करून चटणी बनवली जाते. त्यातील सगळ्यांच्या आवडीची चटणी म्हणजे खोबऱ्याची चटणी. याच चटणीला थोडासा ट्विस्ट देण्यासाठी तुम्ही काकडी टाकू शकता. चला तर जाणून घेऊया खोबर काकडीची चवदार चटणी बनवण्याची रेसिपी.

साहित्य:
खोबऱ्याचे तुकडे
काकडी
तेल
लसूण
डाळ
लाल तिखट
हळद
जिरं
मोहरी
हिंग




कढीपत्ता

कृती: खोबर काकडीची चटणी बनवण्यासाठी सर्वप्रथम, काकडी स्वच्छ धुवून साल काढून बारीक तुकडे करून घ्या. कढईमध्ये तेल गरम करून त्यात जिरं, मोहरी घालून भाजून घ्या. नंतर त्यात डाळ घालून खमंग भाजा.

सर्व पदार्थ व्यवस्थित भाजून झाल्यानंतर त्यात लसूण टाकून भाजा. त्यानंतर त्यात खोबऱ्याचे तुकडे घालून भाजून घ्या.

तयार केलेल्या मिश्रणात काकडीचे तुकडे टाकून १ मिनिटं मिक्स करा. गॅस बंद करून मिश्रण थंड करा.

मिक्सरच्या भांड्यात थंड केलेले मिश्रण टाकून वरून थोडस पाणी घालून पेस्ट तयार करा.

तयार केलेली चटणी वाटीमध्ये काढून घ्या आणि चवीनुसार मीठ टाकून मिक्स करा.

फोडणीच्या वाटीमध्ये तेल गरम करून त्यात कढीपत्ता घालून गॅस बंद करा आणि वरून हळद घाला. आवश्यकता वाटल्यास तुम्ही

त्यात लाल तिखट सुद्धा टाकू शकता.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेली खोबर काकडीची चवदार चटणी

## उन्हामुळे चेहऱ्यावर वाढलेले टॅनिंग कमी करण्यासाठी सोप्या पद्धतीने बनवा फेसमास्क, जावेद हबीबचा सोपा घरगुती उपाय

उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये त्वचा अधिक तेलकट आणि चिकट होऊन जाते. याशिवाय उन्हात फिरल्यामुळे त्वचा अधिक काळी दिसू लागते. त्वचेवर टॅनिंग वाढू लागल्यानंतर चेहरा अधिकच निस्तेज आणि रुक्ष होऊन जाते. चेहऱ्यासोबतच हातापायांवर टॅनिंग वाढू लागल्यानंतर महिला बाजारात उपलब्ध असलेल्या स्किन ब्राइटनिंग ट्रीटमेंट करून घेतात. या ट्रीटमेंट केल्यानंतर त्वचा अधिक उजळदार आणि सुंदर दिसते. मात्र कालांतराने पुन्हा एकदा त्वचा होती तशीच होऊन जाते. चेहऱ्यावर वाढलेले टॅनिंग घालवण्यासाठी बाजारात अनेक वेगवेगळ्या क्रीम सुद्धा उपलब्ध आहेत. मात्र क्रीममधील हानिकारक केमिकल त्वचेचे नुकसान करतात. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला त्वचेवर वाढलेले टॅनिंग घालवण्यासाठी जावेद हबीब यांनी सांगितलेला सोपा उपाय सांगणार आहोत.



त्वचेची खराब झालेली गुणवत्ता सुधारण्यासाठी कोणत्याही हानिकारक क्रीमचा वापर करण्याऐवजी घरगुती उपाय करून त्वचेची काळजी घ्यावी. घरगुती उपाय केल्यामुळे त्वचा अधिक सुंदर होते. त्वचेसाठी नैसर्गिक आणि घरगुती उपाय अतिशय प्रभावी ठरतात. कॉफीचा मास्क त्वचेवर लावल्यामुळे त्वचा अधिक निस्तेज आणि सुंदर होते. यासोबत तुमचा चेहरा सुंदर उजळदार होईल.

कॉफी फेसमास्क बनवण्याची कृती: फेसमास्क बनवण्यासाठी सर्वप्रथम, वाटीमध्ये कॉफी पावडर घेऊन त्यात मध टाकून मिक्स करा. सर्व पदार्थ मिक्स झाल्यानंतर जाडसर पेस्ट तयार होईल. तयार केलेली पेस्ट संपूर्ण चेहऱ्यावर लावून काहीवेळ तसेच ठेवा. त्यानंतर हलक्या हाताने त्वचेवर मसाज करा. यामुळे त्वचेवरील डेड स्किन निघून जाईल आणि चेहरा उजळदार दिसेल. आठवडाभर नियमित हा उपाय केल्यास उन्हामुळे त्वचेवर वाढलेले टॅनिंग कमी होईल.

त्वचेवर वाढलेले टॅनिंग कमी करण्यासाठी जावेद हबीब यांनी सांगितलेला हा उपाय अतिशय प्रभावी ठरेल. याशिवाय तुम्ही वाटीमध्ये दही आणि बेसन घेऊन त्यात चिमूटभर हळद घालून मिक्स करा. तयार केलेला फेसपॅक संपूर्ण चेहऱ्यावर व्यवस्थित लावून घ्या. यामुळे त्वचेवर वाढलेले टॅनिंग कमी होईल आणि त्वचा उजळदार दिसेल. फेसपॅक लावून काहीवेळ ठेवल्यानंतर पाण्याने नंतर त्वचा स्वच्छ करून घ्या.

## शाकाहारी प्रेमींसाठी खास! यंदाच्या विकेंडला घरी बनवून पहा रेस्टॉरंट स्टाइल नोट करा रेसिपी

देशात चायनीज लव्हर्सची काही कमी नाही. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच इंडो-चायनीज फूड खायला फार आवडतं. चायनीजमध्ये चिलीचा प्रकार फार फेमस चिकन चिली, पनीर चिली आणि यातीलच एक म्हणजे सोया चिली. सोयाबिन अनेकांना खायला आवडत नाही मात्र यात भरपूर पोषक घटक असतात जे आपल्या आरोग्यासाठी फायद्याची ठरतात अशात तुम्ही यापासून चविष्ट अशी सोयाबीन चिली तयार करू शकता. अनेक हॉटेल्स अथवा ढाब्यांमध्ये हा पदार्थ फार लोकप्रिय आहे मात्र आज आम्ही तुम्हाला याची एक सोपी रेसिपी सांगणार आहोत.

सोया चंक्स हे प्रोटिनने भरलेले आणि चविष्ट पर्याय आहे, जे शाकाहारी लोकांसाठी मटण किंवा चिकनला उत्तम पर्याय ठरते. सोया चिली ही इंडो-चायनीज डिश आहे, जी थोडी झणझणीत, गोडसर आणि खमंग लागते. सोया चंक्सना मसाल्यात मॅरिनेट करून, कुरकुरीत फ्राय करून, चायनीज सॉससह परतवले जाते. ही रेसिपी पार्टी स्नॅक्स, स्टार्टर किंवा संध्याकाळच्या खाऊसाठी खूपच छान पर्याय आहे. चला जाणून घेऊया यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.

साहित्य सोया चंक्स – १ कप
आलं–लसूण पेस्ट – २ चमचा
तिखट – १/२ चमचा
हळद – १/४ चमचा
कॉर्नफ्लोअर – २ चमचे
मैदा – १ चमचा
पाणी – गरजेप्रमाणे
तेल – तळण्यासाठी
कांदा (चिरलेला) – १ मध्यम
सिमला मिरची (चिरलेली) – १ मध्यम
हिरव्या मिरच्या – २ (लांब चिरून)
सोया सॉस – १ चमचा
चिली सॉस – १ चमचा
टोमॅटो सॉस – २ चमचे
व्हिनेगर – १ टीस्पून
काळी मिरी पावडर – १/४ चमचा
मीठ – चवीनुसार
कांद्याची पात – सजावटीसाठी
तेल – १–२ चमचे

कृती सोया चिली तयार करण्यासाठी सर्वप्रथम एका भांड्यात पाणी उकळा, त्यात सोया चंक्स टाका आणि ७–८ मिनिटं शिजवून घ्या. नंतर पाणी गाळा आणि चंक्स थोडे दाबून कोरडे करा.

शिजवलेले सोया चंक्स वरील मॅरिनेशनच्या साहित्यात मिसळा. चांगलं मिक्स करून १५–२० मिनिटं मॅरिनेटसाठी ठेवा.

गरम तेलात मॅरिनेट केलेले चंक्स कुरकुरीत होईपर्यंत तळून घ्या. किचन टिशूवर काढा.

कढईत थोडं तेल गरम करून त्यात आलं–लसूण पेस्ट, हिरव्या मिरच्या, कांदा व सिमला मिरची घालून थोडंसं परतवून घ्या.

त्यात सोया सॉस, चिली सॉस, टोमॅटो सॉस, व्हिनेगर, मीठ आणि काळी मिरी टाकून चांगलं मिक्स करा.

तळलेले सोया चंक्स या मिश्रणात घालून २–३ मिनिटं मिक्स करा, जेणेकरून चंक्सवर सॉस चांगले माखतील.

वरून कांदापात टाकून यांना गरमागरम सर्व्ह करा. हवे असल्यास तुम्ही थोडी कॉर्नफ्लोअर-पाण्याचाची स्लरी घालून ग्रेवी जाडसर करू शकता.

## वाढलेले वजन होईल झपाट्याने कमी! सकाळी उपाशी पोटी करा 'या' हिरव्या चहाचे सेवन, पोटावर वाढलेली चरबी होईल कमी

वजन वाढल्यानंतर ते कमी करण्यासाठी महिला सतत काहींना काही करत असतात. कधी बाजारात उपलब्ध असलेल्या वेगवेगळ्या पदार्थांचे सेवन केले जाते तर कधी प्रोटीनशेक पिऊन वजन कमी केले जाते. मात्र प्रोटीनशेक प्यायल्यामुळे किडनीच्या आरोग्याला हानी पोहचण्याची शक्यता असते. त्यामुळे वजन कमी करताना आहारात कोणत्याही प्रोटीनशेकचे सेवन करू नये. वजन कमी करण्यासाठी तुम्ही शेवग्याच्या शेंगांचे आहारात सेवन करू शकता. शेवग्याच्या भाजीपासून शेंगाची भाजी, शेव, चिक्की, सूप, चटणी इत्यादी अनेक पदार्थ बनवले जातात. मात्र आज आम्ही तुम्हाला शेवग्याच्या शेंगांचा चहा बनवण्याची कृती आणि यामुळे शरीराला नेमके काय फायदे होतात? याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत.

शेवग्याच्या शेंगा आरोग्यासाठी अतिशय प्रभावी आहेत. यामुळे हाडांचे आरोग्य सुधारते आणि शरीराचे कार्य सुरळीत चालू राहते. महिलांच्या आरोग्यासाठी शेवग्याच्या शेंगा अतिशय गुणकारी आहेत.



या शेंगांचे सूप लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं प्यायला दिले जाते. शेवग्याच्या शेंगांची भाजी बनवताना त्याच्या वरील साली फेकून दिल्या जातात. मात्र साली फेकून न देता त्यांच्यापासून तुम्ही सालींपासून चहा बनवू शकता. चला तर जाणून घेऊया चहा बनवण्याची कृती.

साहित्य:
शेवग्याच्या शेंगा
वेलची
दालचिनी

कृती:
शेवग्याच्या शेंगाचा चहा बनवण्यासाठी सर्वप्रथम, शेंगांची साल काढून उन्हात साली सुकवून घ्या. त्यानंतर कडक सुकवून घेतलेल्या साली मिक्सरच्या भांड्यात घेऊन त्यात दालचिनी आणि वेलची घालून बारीक पावडर करून घ्या. तयार केलेली पावडर काचेच्या बंद डब्यात भरून ठेवा. चहा बनवण्यासाठी सर्वप्रथम, टोपात पाणी घालून गरम करून त्यात शेवग्याच्या शेंगाची पावडर घालून चहा बनवून घ्या. चहा गाळून उपाशी पोटी सेवन केल्यास वाढलेले वजन कमी होते.

शेवग्याच्या शेंगांचे फायदे: शेवग्याच्या शेंगांमध्ये फायबर, प्रोटीन आणि जीवनसत्त्व इत्यादी अनेक घटक आढळून येते. यामुळे शरीराला आवश्यक पोषण मिळते. शेवग्याच्या शेंगा खाल्यामुळे हाडांना योग्य ते पोषण मिळते. हाडांमध्ये वाढलेल्या वेदना कमी करण्यासाठी शेवग्याच्या शेंगांचे सूप प्रभावी ठरेल. वाढलेले वजन कमी करताना आहारात कोणत्याही चुकीच्या पदार्थांचे सेवन करण्याऐवजी आहारात शेवग्याच्या शेंगांचे सेवन करावे. यामुळे स्नायूंची ताकद टिकून राहते आणि शरीराला अनेक फायदे होतात.

# जेवणात तोंडी लावण्यासाठी तिखट पदार्थ हवा असेल तर लाल मिरच्यांपासून झटपट बनवा झणझणीत वऱ्हाडी ठेचा

जेवणाची चव वाढवण्यासाठी रोजच्या आहारात अनेक वेगवेगळ्या पदार्थांचे सेवन केले जाते. कधी गोड पदार्थ खाल्ला जातो तर कधी आंबट तिखट लोणचं खाल्लं जात. मात्र नेहमीच हे पदार्थ खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही तिखट पदार्थ खाण्याची इच्छा होते. त्यात प्रामुख्याने खाल्ला जाणारा पदार्थ म्हणजे तिखट ठेचा. कोल्हापुरी चवीचा तिखट ठेचा सगळेचजण आवडीने खातात. अगदी लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं भाकरीसोबत ठेचा खायला खूप आवडतो. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला जेवणात तोंडी लावण्यासाठी लाल मिरच्यांपासून झणझणीत वऱ्हाडी ठेचा बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. हा ठेचा अनेक तिखट पदार्थांचा




वापर करून बनवला जातो. चला तर जाणून घेऊया वऱ्हाडी ठेचा बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:
लाल मिरच्या
लिंबाचा रस
लसूण
मीठ
आल्याचा तुकडा
जिरं
तेल

कृती: वऱ्हाडी ठेचा बनवण्यासाठी सर्वप्रथम, सुकलेल्या लाल मिरच्या स्वच्छ साफ करून पाण्याने धुवून घ्या. त्यानंतर कपड्याने कोरड्या करा.

ठेचा बनवताना मिरच्या व्यवस्थित कोरड्या करून घ्या. मिरच्या व्यवस्थित न सुकल्यास ठेचा खराब होण्याची जास्त शक्यता असते.

कढईमध्ये तेल गरम करून त्यात लाल मिरच्या भाजून घ्या. नंतर त्यात लसूण पाकळ्या घालून मिक्स करा.

गॅस बंद करून भाजून घेतलेले सर्व साहित्य थंड करा. मिक्सरच्या भांड्यात लाल मिरच्या आणि लसूण घालून बारीक करा.

त्यानंतर त्यात लिंबाचा रस आणि आल्याचा तुकडा घालून बारीक वाटून घ्या. सगळ्यात शेवटी जिरं घालून बारीक पेस्ट तयार करा.

तयार केलेला ठेचा वाटीमध्ये काढून त्यात चवीनुसार मीठ घालून मिक्स करा.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेला वऱ्हाडी ठेचा. हा ठेचा भाकरीसोबत अतिशय चविष्ट लागेल.

## सतत लिपस्टिक लावून काळवंडलेले ओठ काही क्षणात होतील गुलाबी! 'या' पद्धतीने घरी तयार घरगुती लीप मास्क

चेहऱ्याच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी ओठांना सुंदर लिपस्टिक लावली जाते. यामुळे त्वचेचे सौंदर्य अधिक उठावदार आणि सुंदर दिसते. मेकअप करताना काहींना काजळ लावण्याची सवय असते, तर काहींना नेहमीच लिपस्टिक लावण्याची सवय असते. बाजारात अनेक वेगवेगळ्या ब्रॅण्डच्या आणि रंगाच्या लिपस्टिक उपलब्ध आहेत. बाहेर फिरायला जाताना मेकअप केल्यानंतर ओठांना लिपस्टिक, डोळ्यांना काजळ आयशॅडो इत्यादी अनेक गोष्टी लावल्या जातात. मात्र ओठांना वारंवार लिपस्टिक लावणे धोक्याचे ठरू शकते. कारण लिपस्टिक तयार करताना हानिकारक रसायनांचा वापर केला जातो. यामुळे ओठ कोरडे पडणे, ओठांची त्वचा काळी होणे इत्यादी अनेक समस्या उद्भवू लागतात. ओठ काळवंडलेले आणि काळे दिसण्यासाठी सुरुवात झाल्यानंतर मुली बाजारात उपलब्ध असलेल्या वेगवेगळ्या लीप बामचा वापर करतात. लीप बाम लावल्यामुळे ओठ हायड्रेट राहतात. याशिवाय काळे झालेले ओठ पुन्हा एकदा गुलाबी करण्यासाठी बाजारात उपलब्ध असलेल्या वेगवेगळ्या स्किन केअर प्रॉडक्टचा वापर करतात. मात्र तरीसुद्धा ओठ चांगले दिसत नाहीत. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला ओठांची खराब झालेली त्वचा गुलाबी करण्यासाठी घरगुती लीप मास्क बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया सविस्तर. लीप मास्क बनवण्याची कृती: कोरफड जेल मध बीट पावडर खोबरेल तेल कृती: लीप मास्क बनवण्यासाठी सर्वप्रथम, वाटीमध्ये कोरफड जेल घेऊन त्यात मध, बीटरुट पावडर घालून सर्व साहित्य चमच्याने मिक्स करून घ्या. त्यानंतर तयार केलेल्या मिश्रणात खोबऱ्याचे तेल घालून व्यवस्थित मिक्स करा. तयार केलेले मिश्रणात बंद बाटलीमध्ये भरून ठेवा.

# ज्या मातीत जन्मलो त्या मातीचे देणे लागतो ही भावना अभ्यासाबरोबरच शालेय विद्यार्थ्यांच्या मनात रुजवावी

लातूर : – उद्याचा देश कसा घडणार आहे, देशाची पुढची काय दिशा असेल याचा संपूर्ण पाया शाळेत उभा राहतो यामुळे शिक्षणाबरोबरच समाजात कसे वावरले पाहिजे ज्या मातीत आपण जन्मलो त्या मातीचे काहीतरी देणे लागतो ही भावना शालेय विद्यार्थ्यांच्या मनात रुजली पाहिजे अशी अपेक्षा भाजपाचे युवा नेते ऋषिकेश रमेशआप्पा कराड यांनी व्यक्त केली.

शाळेच्या पहिल्या दिवस निमित्ताने रेणापूर तालुक्यातील मौजे खरोळा येथील जिल्हा परिषद केंद्रीय कन्या शाळा, इंदिरा माध्यमिक विद्यालय आणि जिल्हा परिषद प्रशाला येथे सोमवारी सकाळी मोठ्या उत्साहाच्या वातावरणात भाजपाचे युवा नेते ऋषिकेश कराड यांच्या हस्ते शालेय विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. शैक्षणिक साहित्याचे त्याचबरोबर लातूर ग्रामीणचे आमदार रमेशआप्पा कराड यांच्या जन्मदिनानिमित्ताने मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले यांच्या वतीने विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. यावेळी जि.प. चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अभंगे, रेणापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुमित जाधव, गटशिक्षणाधिकारी कृष्णा भराडीया, विस्ताराधिकारी लहाने, भाजपाचे मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले, जि.प. केंद्रीय कन्या शाळेच्या




मुअ. एम. एम. सुरनर, इंदिरा विद्यालयाच्या मुअ एक. व्ही. कारभारी, जि..प प्रशालेचे मुअ. जी. एम. गुरमे, सरपंच धनंजय देशमुख, उपसरपंच बाबनसाब शेख, हनुमंत काका राऊतराव, सोमनाथ फुलारी, राजू मानमोडे, राजू कांबळे, सचिन आडतराव, प्रल्हाद फुलारी, गोविंद धबडगे, खलील ताशेवाले, रमेश बाबर, प्रताप राऊतराव, बब्बूअण्णा आडतराव, मंचक राऊतराव, नितीन राऊतराव, जगन्नाथ खळे, सुरेश जाधव, राहुल कांबळे यांच्यासह त्या त्या शाळेत शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व शालेय विद्यार्थी–विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला शाळेबद्दल आपुलकी जिव्हाळा प्रेम निर्माण व्हावा अभ्यासाबरोबरच खेळाला महत्त्व देऊन सामाजिक ज्ञान देणे गरजेचे आहे असे सांगून यावेळी बोलताना युवा नेते ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, देशाचे उद्याचे भविष्य घडविण्याचे महान कार्य शिक्षकांच्या हातून होत असते प्रत्येकाच्या यशात शिक्षकांच्या मेहनतीचा मोठा वाटा असून त्यांच्याबद्दल प्रत्येकाच्या मनात मानसन्मान असायला हवा असे बोलून दाखवले.

कोणताच शिक्षक वाईट नसतो, मूर्तिकार जेव्हा छन्नी हातोड्याचा वार करत असतो तेव्हा त्याचा त्रास दगडालाच होतो पण ज्यावेळी मूर्ती तयार होते तेव्हा कौतुक मूर्तीचे होते छन्नी हातोड्याचे होत नाही. त्याप्रमाणे मेहनत घेताना त्रास होत असेल तर विद्यार्थ्यांना चांगले घडविणे हाच शिक्षकांचा उद्देश असतो हे सर्व विद्यार्थ्यांनी समजून घेतले पाहिजे असे सांगून खरोळा आणि परिसरातील शाळेंना जी काही मदत लागेल ती आमदार रमेशआप्पा कराड साहेबांच्या माध्यमातून निश्चितपणे पूर्ण केली जाईल असे ऋषिकेशदादा कराड यांनी बोलून दाखविले. खरोळा येथील तिन्ही शाळेत मोठ्या उत्साहाच्या वातावरणात विद्यार्थी स्वागतचा कार्यक्रम झाला त्या त्या शाळेतील संबंधितांनी प्रस्ताविकातून शाळेच्या प्रगतीची माहिती दिली.

# उदगीर शहरात विविध विकास कामांचा शुभारंभ

उदगीर : माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांच्या प्रयत्नातून उदगीर शहरात नागरिकांना मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी दलितवस्ती, नगरोत्थान योजनेतुन प्रभाग क्रमांक ०४ पंचशील नगर देगलुर रोड व प्रभाग क्रमांक १५ मधील रमेश अंबरखाने यांच्या घरासमोर काँक्रीट नालीच्या कामाचा शुभारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, कार्याध्यक्ष शशिकांत बनसोडे, माजी उपनगराध्यक्ष फैजुखाँ पठाण, माजी नगरसेवक अनिल मुदाळे, राजकुमार भालेराव, शेख फैय्याज, पाशा मिर्झा, नरसिंग शिंदे, व्यंकट बोईनवाड, राजकुमार चव्हाण, इब्राहिम पटेल नाना, सनाउल्ला खान, प्रदीप जोंधळे, शफी हाशमी, मधुमती कनशेट्टे, वैशाली



कांबळे, हुस्ना बानो, राहुल सोनवणे,आजम पटेल,ईस्माईल मौलाना, शेख अमजद मौलाना, अविनाश गायकवाड,गौतम कांबळे,सतीश कांबळे, राजकुमार गंडारे,बापु साळुंके, हाशमी हिफ्जुरहेमान, राम सोनवणे, प्रदीप गवळे यांच्यासह परिसरातील नागरिक व पक्षातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मान्सुनपूर्व जेसीबी मार्फत मोठे, छोटे नाले सफाईचे काम पुर्ण

लातूर/प्रतिनिधी:– लातूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात मान्सुन पुर्व नालेसफाई करणे आवश्यक असल्याने शहरात मोठे एकूण ६८ नाले व छोटे ८४ असे एकूण १५२ नाले सफाई करणेसाठी लातूर शहर महानगरपालिका मार्फत ४ मोठे जे.सी.बी, ४ छोटे जे.सी.बी, १ पोकलेन व ८ हायवा यंत्रणेमार्फत दि.०१.०५.२०२५ पासून मान्सुन पुर्व नाले सफाईची मोहिम हाती घेण्यात आली होती एकूण ५१३५ मे.टन गाळ उचलण्यात आलेला आहे. तरी लहान व मोठे नाल्यांचे सफाईचे काम दि.१३.०६.२०२५ रोजी पूर्ण करण्यात आलेले आहे. तसेच प्रभाग निहाय अंतर्गत नाल्या मनपा सफाई कर्मचा–या मार्फत ३०.०६.२०२५ पर्यंत सफाई करण्यात येत आहे.







सदर मान्सूनपुर्व नाले सफाईच्या कामाच्या नियंत्रणासाठी ४ मुख्य स्वच्छता निरीक्षक, १८ स्वच्छता निरीक्षक व छोट्या नाल्या साफ सफाई साठी ३५० स्वच्छता कर्मचारी कार्यरत आहेत.

तसेच पावसाळ्यामध्ये आपत्काली परिस्थीतत कामे करण्यासाठी लातूर शहर महानगरपालिका येथे आपत्कालीन कक्षाची स्थापना करण्यात आली असून सदर कक्ष दैनंदिन २४ तास कार्यरत असून आपत्कालीन कक्षात दैनंदिन कामासाठी १ स्वच्छता निरीक्षक, २ मुकादम व १४ स्वच्छता कर्मचारी, १ जे.सी.बी, २ ट्रॅक्टर व आपात्कालीन कामात लागणारे आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले असून या यंत्रणे मार्फत दि.०१ जुन २०२५ पासून नियमीत चालू असून आपत्कालीन परिस्थीती मध्ये लातूर शहर महानगरपालिके मार्फत हेल्पलाईन नंबर.०२३८२–२५५५८५, टोल फ्रि क्रमांक १८००२३३१३८८ क्रमांक व लॅण्डलाईन क्रमांक वर आपत्कालीन परिस्थितीत संपर्क साधवा अशे आवाहान लातूर शहर महानगरपालिके मार्फत करण्यात येत आहे.

# नाशिकच्या राजकारणाला मिळणार कलाटणी? सुधाकर बडगुजर यांचा भाजपमध्ये प्रवेश

मुंबई : नाशिकमधील मोठे नेते सुधाकर बडगुजर यांनी आज भाजपमध्ये प्रवेश केला. मुंबईमधील पक्ष कार्यालयात हा प्रवेश सोहळा पार पडला. सुधाकर बडगुजर यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने नाशिकच्या राजकारणाला कलाटणी मिळण्याची शक्यता आहे. या प्रवेशामुळे नाशिक महापालिकेच्या निवडणुकीपूर्वी भाजपची ताकद वाढली. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन आणि कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थित हा पक्षप्रवेश पार पडला.

भाजपमध्ये पक्षप्रवेश करण्यापूर्वी सुधाकर बडगुजर यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन केले. त्यांच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. बडगुजर यांच्या पक्षप्रवेशाला भाजपच्या स्थानिक नेत्यांनी विरोध केला होता, मात्र हा विरोध झुगारून बडगुजर यांनी भाजपचा झेंडा हाती घेतला. त्यांच्यासोबत बबन घोलप आणि काँग्रेस तसेच इतर पक्षांमधील अनेक माजी पदाधिकारी आणि नगरसेवक यांनीदेखील भाजपमध्ये प्रवेश केला.

कोण आहेत सुधाकर बडगुजर? २००७ पासून सुधाकर बडगुजर यांची राजकीय कारकीर्द सुरू झाली. २००७ मध्ये ते नाशिक महापालिकेत अपक्ष नगरसेवक म्हणून निवडून आले होते. त्यावेळी शिवसेनेचे नगरसेवक तथा माजी महानगरप्रमुख विनायक पांडे हे अपक्ष नगरसेवकांच्या पाठिंब्यावर महापौरपदी विराजमान झाले होते. तेव्हाच्या अपक्षांच्या गटात सुधाकर बडगुजर यांचा समावेश होता. यातूनच बडगुजर शिवसेनेच्या संपर्कात आले. १४ जून २००८ रोजी एका जलकुंभाच्या भूमिपूजन कार्यक्रमात बडगुजर यांचा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि खासदार संजय राऊत यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश झाला.

३ वर्षे नाशिक महापालिकेचे सभागृहनेतेपद अभ्यासू आणि आक्रमक शैलीमुळे बडगुजर यांच्याकडे पक्षाने २००९ ते २०१२ अशी तीन वर्षे नाशिक महापालिकेचे सभागृहनेतेपद सोपविले. पुढे नाशिक महापालिकेची सत्ता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडे गेल्यानंतर २०१२ ते २०१५ अशी तीन वर्षे बडगुजर यांनी विरोधी पक्षनेतेपद भूषविले. २०१४ मध्ये त्यांना पक्षाने नाशिक पश्चिम विधानसभा मतदारसंघाची उमेदवारी दिली यात त्यांचा पराभव झाला. २०१९ साली नाशिक पश्चिम विधानसभा मतदारसंघातून ठाकरे गटाने सुधाकर बडगुजर यांना पुन्हा एकदा संधी दिली होती. मात्र, त्या निवडणुकीत देखील सुधाकर बडगुजर यांचा पराभव झाला.

# जळगावात नरबळी!

जळगाव : प्रतिनिधी जळगाव जिल्ह्यातील एरंडोल तालुक्यातील रिंगणगाव येथे एका १४ वर्षीय शाळकरी मुलाचा गळा चिरून खून करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. राजेश महाजन असे मृत मुलाचे नाव असून, पोलिसांनी नरबळीचा संशय व्यक्त केला आहे.

दरम्यान, जळगाव जिल्ह्यातील एरंडोल तालुक्यातील रिंगणगाव येथे एका १४ वर्षीय शाळकरी मुलाचा गळा चिरून खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. राजेश गजानन महाजन (वय १४, रा. रिंगणगाव, ता. एरंडोल) असे मयत बालकाचे नाव असून, नरबळीचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

राजेश महाजन हा रिंगणगाव येथे आई–वडील आणि मोठ्या बहिणीसोबत राहत होता. त्याचे वडील गजानन महाजन शेतीकाम करण्यासोबतच हार्डवेअरचे दुकान चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. सोमवारी (दि. १६) जून रोजी गजानन महाजन जळगावला कामानिमित्त गेले होते. त्यांनी राजेशला दुकानावर बसण्यास सांगितले होते. राजेशने दुकान बंद करून घरी परतावे अशी कुटुंबाची अपेक्षा होती, परंतु तो घरी आला नाही. सोमवारी गावाचा बाजाराचा दिवस असल्याने कुटुंबीयांनी त्याची शोधाशोध सुरू केली आणि एरंडोल पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली.

# कुमारी : वैजू अंभोरे यांचा वाढदिवस गरजवंतांना अन्नधान्य किट वाटप करून साजरा

नवी मुंबई / के. एच. हनवते :– वाशी येथील रहिवासी कुमारी वैजू सारंधर अंभोरे यांचा वाढदिवस अन्नधान्याचे किट वाटप करून साजरा करण्यात आला, त्यावेळी दैनिक महावृत्ताचे पत्रकार : कल्याणराव हनवते हे या कार्यक्रमस्थळी उपस्थित राहुन वैजू अंभोरे यांना जयंती विशेषांक भेट देऊन मनापासून हार्दिक शुभेच्छा दिल्या त्यावेळी शुभेच्छा पर बोलताना हनवते म्हणाले की, अंभोरे परिवार हे गेल्या अनेक वर्षापासून वाशी नवी मुंबई या ठिकाणी रहात आहेत आणि त्यांनी त्यांच्या कारकिर्दीमध्ये धम्मसेवा असो की राजकारण असो यात ते सक्रियपणे भाग घेतात व सरळ हस्ते समाजाला मदत करत असतात आणि अशा या अंभोरे परिवाराची सुकन्या : वैजू अंभोरे, स्मिता अंभोरे यांचा वाढदिवस कसलाही गाजावाजा न करता अवाढव्य खर्च न करता छोटेखानी वाढदिवस साजरा करुन समाजाला मदत करत असतात, गेल्या कोरोना लॉक डाऊन काळामध्ये पण त्यांनी अनेक लोकांना मदतीचा हात म्हणून आर्थिक स्वरूपात असेल किंवा अन्नधान्याचे किट वाटप करून लोकांची ते मदत करत आले आहेत. अशा या दानशूर अंभोरे परिवाराचे कौतुक करावे तेवढे कमीच आहेत.






# आयटीआर भरताय? 'हे' ५ नियम जाणून घ्या, नाहीतर ३० जूनपर्यंत तुम्हाला मिळू शकते नोटीस

आयटीआर भरण्यासाठी लगबग सुरु झाली असून त्यासाठी अनेकजण स्वतः तर काहीजण सीए, कर सल्लागाराची मदत घेत आहेत. नवीन आर्थिक वर्षात करविषयक नियमात नवीन गोष्टींची भर पडली असून लोक याचाही अभ्यास करत आहेत तर काहींना याची यत्किंचितही कल्पना नाही.

यंदा आयकर विभाग केवळ तुमचे रिटर्नच स्वीकारणार असे नाही तर नियोजित वेळेत उत्पन्न, सुट, गुंतवणूक आणि अन्य तपशीलांचा ताळमेळ जुळवणार आहे.




नवीन आर्थिक वर्षात आयकर रिटर्न (आयटीआर) भरणाऱ्या लोकांसाठी असे काही मोठे बदल झाले आहेत. त्या विशेषतः आयटीआरच्या छाननी प्रक्रियेशी संबंधित आहेत. आता काही प्रकरणांमध्ये आयकर विभाग तुमच्या रिटर्नची सखोल तपासणी करणार आहे. कर नियमांचा गैरवापर रोखण्यासाठी आणि पारदर्शकता वाढवण्यासाठी हे पाऊल आयकर विभागाकडून उचलण्यात आले आहे.

कोणत्या प्रकरणांमध्ये रिटर्नची छाननी निश्चितपणे केली जाईल हे केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळ अर्थात सीबीडीटीच्या नवीन मार्गदर्शक तत्वात असून ते १४ जून २०२५ रोजी जारी करण्यात आले आहेत.

या प्रकरणात होणार छाननी..

१. कर सर्वेक्षणानंतर दाखल केलेला आयटीआर – जर १ एप्रिल २०२३ नंतर तुमच्या ठिकाणी आयकर सर्वेक्षण (कलम १३३अ, उपकलम २अ वगळता) केले गेले असेल, तर तुमचे रिटर्न छाननीसाठी निवडले जाईल.

२. छापा टाकलेले अथवा जप्त दस्ताऐवज – जर १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२५ दरम्यान तुमच्याशी संबंधित कारवाई अथवा आयकर विभागाने छापा टाकला असेल किंवा कागदपत्रे जप्त केली असतील (कलम १३२ किंवा १३२अ अंतर्गत), तर तुमचे रिटर्न देखील छाननीखाली असेल.

३. नोंदणी रद्द केल्यानंतरही सूट मिळण्याचा दावा – जर १२–, १२–इ, १०(२३उ) किंवा ३५(१) सारख्या कोणत्याही संस्थेची किंवा ट्रस्टची कर सूटशी संबंधित नोंदणी ३१ मार्च २०२४ पर्यंत रद्द केली गेली असेल आणि तरीही ती कर सूट मिळवण्याचा प्रयत्न करत असेल, तर त्याचीही छाननी केली जाईल.

४. गेल्या वेळी उत्पन्नात मोठी वाढ – जर शेवटच्या मूल्यांकनात तुमचे उत्पन्न महानगरांमध्ये ५० लाखांपेक्षा जास्त आणि इतर शहरांमध्ये २० लाखांपेक्षा जास्त वाढले असेल आणि तुम्ही त्याविरुद्ध अपील केले नसेल किंवा अपील गमावले असेल, तर तुमचा पुढील आयटीआर देखील चौकशीसाठी ओळखला जाऊ शकतो.

५. तपास संस्थांकडून मिळालेली माहिती – जर सीबीआय, ईडी किंवा इतर तपास संस्थांनी तुमच्याविरुद्ध आयकर विभागाला कोणतीही कर संबंधित माहिती दिली असेल आणि तुम्ही आयटीआर दाखल केला असेल, तर तुमचा खटला देखील स्वयंचलित चौकशीखाली येईल.

चौकशीची सूचना कधी येईल?

जर तुमचा खटला वरीलपैकी कोणत्याही श्रेणीत येत असेल, तर तुम्हाला ३० जून २०२५ पर्यंत चौकशीशी संबंधित सूचना मिळू शकते. प्रकरण तपासापासून दूर ठेवण्यासाठी प्रधान मुख्य आयकर आयुक्त ची परवानगी आवश्यक असेल. या प्रकरणांमध्ये लागू होणार नाही. आंतरराष्ट्रीय कर प्रकरणे आणि मध्यवर्ती मंडळ प्रकरणांमध्ये यावेळी छरऋ–उ (नॅशनल फेसलेस असेसमेंट सेंटर) ची प्रक्रिया लागू होणार नाही. या प्रकरणांमध्ये पारंपारिक तपास प्रक्रिया अवलंबली जाईल. जर तुम्हाला तुमचा रिटर्न कोणत्याही अडचणीशिवाय पास करायचा असेल, सर्व कागदपत्रे योग्यरित्या भरावे लागतील.

# नाशिकमध्ये राजकीय खेळ ! नवरा ठाकरे, तर बायको शिंदे गटात; बाळा दराडेंच्या पत्नीचा धक्कादायक प्रवेश

नाशिक : नाशिकच्या राजकारणात एक मोठी उलथापालथ पाहायला मिळत आहे. शिवसेना ठाकरे गटाला सातत्याने गळती होत असताना आता आणखी एक धक्कादायक वळण समोर आले आहे.

ठाकरे गटाचे उपमहानगर प्रमुख बाळा दराडे यांच्या पत्नी किरण दराडे (माजी नगरसेविका) आणि इतर नेत्यांनी आज (१७ जून) मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना गटात प्रवेश केला आहे. या प्रवेशात पुंजाराम गामने आणि सीमा निगळ या माजी नगरसेविकांचाही समावेश आहे, ज्यामुळे ठाकरे गटाची चिंता वाढली आहे.

नवऱ्याची धमकी, बायकोचा शिंदे गटात प्रवेश बाळा दराडे यांनी काही दिवसांपूर्वी काँग्रेस नेते राहुल गांधी यांना नाशिकमध्ये आल्यास तोंडाला काळे फासण्याची थेट धमकी दिली होती. स्वातंत्र्यवीर सावरकरांविरुद्धच्या वक्तव्यासाठी त्यांनी हा इशारा दिला होता.

मात्र, त्याच बाळा दराडे यांची पत्नी किरण दराडे यांनी ठाकरे गटाला सोडचिठ्ठी देत शिंदे गटाचा मार्ग स्वीकारला आहे. किरण यांनी सांगितले, माझे वडिल हिंदूत्ववादी विचारांचे होते. प्रभागात काम न झाल्याने मी शिंदे गटात प्रवेश करत आहे. माझे पती अजून ठाकरे गटात आहेत, पण त्यांचेही मत बदलेल, असा मला विश्वास आहे.



ठाकरे गटाची गळती सुरूच गेल्या काही दिवसांत सुधाकर बडगुजर यांच्यासह अनेक नेत्यांनी ठाकरे गट सोडला आहे. आता किरण दराडे, पुंजाराम गामने आणि सीमा निगळ यांच्यासारख्या नेत्यांचा शिंदे गटात प्रवेश झाल्याने ठाकरे गटाला आणखी धक्का बसला आहे. किरण यांनी उद्धव ठाकरे यांचा काँग्रेसबरोबरचा संबंध आणि हिंदूत्वाला दुय्यम मानण्याचा आरोप करत आपला निर्णय पक्का केला. शिंदे गटाकडून या प्रवेशाला महत्त्व दिले जात असून, नाशिक महापालिका निवडणुकीपूर्वी पक्षाला बळकटी मिळेल, असा दावा करण्यात येत आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE